# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**वसई किल्ल्याच्या (ता.वसई, जि.पालघर) संरक्षणाबाबत**

**(१) ९१०५ (०७-०४-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील नरवीर चिमाजी आप्पा स्मारकाच्या तटबंदीची संरक्षण भिंत तोडून मोठ्या प्रमाणात गर्दुले व मद्यपींचा धुडगुस, प्रेमीयुवकांचा वावर होत असल्याने सदरहू स्मारकांची सुरक्षा धोक्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाजकंटकाकडून होणा-या उपद्रवास परिणामकारकरित्या प्रतिबंध घालून त्यांचा त्वरित बंदोबस्त करावा अशी मागणी तेथील नागरिकांनी गत २ वर्षांपासून सातत्याने स्थानिक पोलीस स्टेशन ठाणे, वसई, पोलीस आयुक्त, ठाणे/पालघर आदीकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी नरवीर चिमाजी आप्पा स्मारकाची सुरक्षा धोक्यात आल्याबाबत वसई पोलीस स्टेशन येथे स्थानिक लोकांकडुन निवेदन देण्यात आले होते.

नरवीर चिमाजी आप्पा स्मारकाच्या संरक्षणाकरिता वसई-विरार महानगरपालिकेच्या वतीने दिवस रात्रौ सुरक्षा रक्षक नेमण्यात येतात. तसेच, वसई किल्ला या ठिकाणी भारतीय पुरातत्व विभागाचे कार्यालय असुन त्या विभागाचे कर्मचारी संरक्षणासाठी नेमण्यात येतात. याशिवाय पोलीस स्टेशनकडुन देखील वसई किल्ला परिसरात पोलीस पेट्रोलिंग नेमण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व ग्रामपंचायती डिजिटल नेटवर्कने जोडण्याच्या निर्णयाबाबत**

**(२) ६५१६७ (०५-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व ग्रामपंचायती डिजिटल नेटवर्कने जोडण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम कोणत्या कंपनीला दिले आहे व किती टप्प्यांमध्ये करण्यात येणार असून प्रत्येक टप्प्याकरिता किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१६) :** (१) होय, राज्यातील सर्व ग्रामपंचायती डिजिटल नेटवर्कने जोडण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या भारतनेट प्रकल्पामार्फत घेण्यात आलेला आहे.

(२) भारतनेट प्रकल्प दोन टप्प्यामध्ये राबविण्यात येत असून पहिल्या टप्प्यातील काम केंद्र शासनाची संस्था भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेड या संस्थेमार्फत राबविण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम केंद्र शासनाने राज्य शासनाला राबविण्याकरिता दिले आहे. पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यांचे काम राज्य शासनाची संस्था महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत राबविण्यात येते व दुसऱ्या टप्प्यांचे काम पुढील एका वर्षात पूर्ण करण्यात येईल.

---

**मौजे झाई (ता.तलासरी, जि.पालघर) गावच्या दोन मच्छिमारी बोटी एकमेकांवर आदळून झालेला अपघात**

**(३) ६६८१६ (१७-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे झाई (ता.तलासरी, जि.पालघर) गावच्या दोन मच्छिमारी बोटी एकमेकांवर आदळून दिनांक २१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास समुद्रात बुडाल्या असून एकूण १५ खलाशांनी सुरक्षा यंत्रणेशी संपर्क साधला असता मदत न मिळाल्यामुळे अखेर शर्थीचे प्रयत्न करुन मच्छिमारांना किनारा गाठावा लागला, यामुळे मच्छिमारांनी सुरक्षा यंत्रणेविरुध्द तीव्र संताप व्यक्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तटरक्षक दलावर कारवाई करुन बुडालेल्या मच्छिमार बोटींना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) दोन नौका बुडाल्या हे खरे आहे.घोलवड पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी झाई जेटीवर पोहचून कोस्टगार्डचे चिखला व डहाणू येथील कार्यालय,डहाणू तहसिल कार्यालय,पोलीस मित्र, सागरी दल यांचेशी संपर्क साधून मदतीस हजर होते.

(२) सदर आपघातग्रस्त नौकांचे पुनर्वसनासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेतंर्गत सद्याच्या कर्जासह नवीन नौका बांधण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) पोलीस प्रशिक्षण केंद्राचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४) ६७६२१ (१७-०१-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) पोलीस प्रशिक्षण केंद्र या प्रकल्पाला व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पोलीस हौऊसिंग कॉर्पोरेशन यांनी मान्यता दिली असून अनेक वर्षापासून खोळंबलेली कामे कालबद्ध कार्यक्रम आखून पूर्ण करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) राज्यातील विद्यमान पोलीस प्रशिक्षण केंद्रे ही नवीन पोलीस शिपाई यांना प्रशिक्षण देण्यास सक्षम असल्यामुळे वरणगांव येथे नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याची आवश्यकता नाही, असे पोलीस महासंचालक यांनी कळविले असून सदर अहवाल अद्याप स्वीकारलेला नाही.

---

**भांडुप पश्चिम (मुंबई) येथील भावसार नर्सिंग होम मध्ये डॉक्टरांना झालेली मारहाण**

**(५) ८५३५० (०४-०९-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप पश्चिम (मुंबई) येथील भावसार नर्सिंग होम मध्ये दिनांक १० मे, २०१७ रोजी दाखल केलेल्या रुग्णाचा मृत्यु झाल्याप्रकरणी रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टर श्री.सत्यम भावसार यांच्यासह डॉ.वारिस अली व डॉ.नेहा राभांडे यांना मारहाण केल्याची तक्रार भांडुप पोलीस स्थानकात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी मारहाण करणा-यांवर महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट, २०१० अंतर्गत गुन्हा दाखल करतांना या कायद्यातील कलम ५ नुसार नॉन बेलेबल (अजामिन पात्र) गुन्हा नोंदविणे आवश्यक असतांना कायद्यातील कलम ४ अन्वये गुन्हा दाखल करून मारहाण करणा-यांना जामिनावर सोडण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात विशेषतः शहरी भागात खासगी व शासकिय रुग्णालये व दवाखान्यात रुग्णांच्या नातेवाईकांकडून होणारे मारहाणीचे प्रकार वाढत असल्याने पोलीसांनी मारहाण करणा-यांवर महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट, २०१० च्या कलम ५ अन्वये गुन्हा दाखल न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त डॉक्टरांना मारहाण केल्या प्रकरणी महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट, २०१० च्या कलम ५ अन्वये दोषींवर गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) फिर्यादी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने भांडूप पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५१/१७ भा.दं.वि. कलम ३२४, ३२५, ३२३, ५०४, ५०६ (२), ३४ सह कलम ४ महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्य व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारापपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) व (४) महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्य व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१० च्या कलम ४ अन्वये गुन्ह्यातील आरोपीस दंड/शिक्षा करण्याची तरतुद आहे. तसेच कलम ५ नुसार सदर कायद्यान्वये कोणताही गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र असुन तो प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर चालविण्याची तरतुद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यात जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(६) ९५१७४ (०१-०१-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात जुनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसह अन्य काही मागण्यांसाठी येथील चतुर्थश्रेणी कर्मचा-यांनी दोन दिवस संप पुकारुन कल्याण भवनासमोर निदर्शने केली असल्याचे माहे ऑगस्ट,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागण्या पूर्ण न केल्यास बेमुदत संप करण्याचा इशारा चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचा-यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१८) :** (१) व (२) खरे आहे.
(३) व (४) दिनांक ७.७.२०१७ रोजी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ व अन्य संघटनाबरोबर झालेल्या बैठकीत जुन्या पेंशन योजनेसंदर्भातील मागणीवर चर्चा करण्यात आली होती त्यावेळी "नवीन पेंशन योजना केंद्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे राज्यात सन २००५ पासून लागू करण्यात आली असून सदर निर्णयाचा १२ वर्षानंतर पुर्नविचार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही" असा स्वयंस्पष्ट निर्णय घेण्यात आलेला आहे.

---

## जायकवाडी (जि.अहमदनगर) धरणातील पाण्याबाबत उपोषणकर्त्यांना बनावट माहिती दिल्याचे प्रकरण

**(७) ९७२७७ (०६-०१-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी (जि.अहमदनगर) धरणातील पाण्याबाबत उपोषणकर्त्यांना चुकीची माहिती दिल्याप्रकरणी जायकवाडीचे कार्यकारी अभियंता अशोक चव्हाण यांच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करावी व गुन्हा दाखल करण्याची मागणी नेवासा पोलीस ठाण्यात दिनांक १३ ऑगस्ट,२०१७ रोजी वा त्यासुमारास मुकिंदपूर येथील नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) कार्यकारी अभियंता जायकवाडी धरण नाथनगर (उत्तर) यांनी खोटी माहिती खरी असल्याचे भासवून खोटी व बनावट माहिती उपोषणकर्त्यांना दिली म्हणून गुन्हा दाखल करणेबाबत मुकिंदपूर, ता.नेवासा येथील ३ नागरिकांनी दि.३१/०७/२०१७ रोजी पो.स्टे.नेवासा येथे तक्रार अर्ज दिला आहे.
(२) सदर अर्जाबाबत पो.स्टे.नेवासा येथे चौकशी चालू असून संबंधित विभागाचे अभियंता यांचेकडून प्राप्त अहवालानुसार त्यांचे कार्यालयाने तक्रारदार यांना हवी असलेली माहिती ही कार्यालयातील मुळ अभिलेख तपासून दिल्याचे व ती खरी असल्याबाबत कळविले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## पुण्यात तुरुंगातील कैद्यांना पैसे घेऊन हवी असलेली सवलत देत असल्याबाबत

**(८) १००४५८ (०६-०१-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील तुरुंगात असलेल्या कैद्यांकडून पैसे घेऊन कारागृह पोलीस प्रशासन कैद्यांना हवी असलेली सवलत देत असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कैद्यांना पैसे घेऊन सवलत देणाऱ्या कारागृह पोलीस प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीमती चंदनबाई नागिनदास शाह (जि.ठाणे) यांचे अपहरण व खुनाची चौकशी सी.आय.डी. कडून करण्याबाबत**

**(९) १०१३१५ (०६-०१-२०१८). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीमती चंदनबाई नागिनदास शाह (जि.ठाणे) यांचे अपहरण व खून करून खोटे व बनावट मृत्यूपत्र करून शेकडो एकर जमीन व इतर मालमत्ता हडप केल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासन व विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र यांनी निर्देश देऊन देखील चौकशीचा अहवाल सादर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी तक्रारदाराने केंद्रिय अन्वेषण विभाग (सी.आय.डी.) चौकशीची मागणी केली असता अद्यापही हे प्रकरण सी.आय.डी. कडे वर्ग झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील मुरबाड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७८/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६, ४०८, ४६५, ४६७, ४७१ सह नोंदणी कायदा कलम ३७७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपी नथमल रेखचंद संचेती यास दिनांक २३.१०.२०१६ रोजी अटक करण्यात येवून १२ दिवस पोलीस कस्टडी देण्यात आली होती. सद्यस्थितीत आरोपी जामीनावर असून गुन्हा तपासाधिन आहे.

उपरोक्त नमुद गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) यांचेकडे दिनांक १७.०३.२०१८ रोजी वर्ग करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी संस्था मौजे पिंप्रीसेकम, (ता.भुसावळ, जि.जळगाव) या संस्थेची चौकशी करण्याबाबत**

**(१०) १०५०१८ (०७-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी संस्था मौजे पिंप्रीसेकम, (ता.भुसावळ, जि.जळगाव) या संस्थेची चौकशी करुन दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारस गुन्हा क्र. ३०४८/२०१६ दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्हाच्या अनुषंगाने किती जणांना अटक करण्यात आली व दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) व (२) याप्रकरणी सन २०१४ व २०१५ या कालावधीत शासकीय योजनांचे रू.१, ९४, ८८० किंमतीचा गहू व रू. २, १३, ७०८ किंमतीचा तांदूळ धान्याचे शासनाकडून मंजूर झालेले नियतन उचल करून स्व:तचे फायद्यासाठी लाभार्थी यांना वाटप न करता त्यांना धान्य वाटपापासून वंचित ठेवून धान्याचा दुरूपयोग केला अशा फिर्यादीवरून २ आरोपींविरूध्द भुसावळ तालुका पोलीस ठाणे येथे दि. २९.११.२०१६ रोजी भाग ६ गु.र.नं.३०८२/२०१६ भादंवि.क.३४ आणि जि.व.का.क.३ व ७ नुसार नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाअंती आरोपींविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्यस्थितित प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**खोपोली (जि.रायगड) येथील झेनिथ (बिर्ला) कारखान्यातील कामगारांना न्याय मिळण्याबाबत**

**(११) १०५०३८ (१२-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथील झेनिथ (बिर्ला) कारखान्यातील कामगारांच्या लढ्याला चार वर्षे झाली तरी अद्याप या कामगारांना न्याय मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच या कारखान्याच्या खोपोलीतील वसाहतीमध्ये राहणा-या कामगारांच्या कुटुंबाला नाहक त्रास देण्याच्या हेतूने व्यवस्थापनातर्फे खोट्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या कारखान्यातील कामगारांना न्याय मिळण्याकरीता शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०८-२०१८) :** (१) होय.

मे.झेनिथ बिर्ला (इंडिया) लि.या कंपनीच्या व्यवस्थापनाने दिनांक २७/११/२०१३ रोजीच्या टाळेबंदी सुचनेनुसार उत्पादन स्थगित करुन दिनांक १२/१२/२०१३ पासुन टाळेबंदी लागु केली आहे.सदर टाळेबंदी बेकायदेशिर घोषित करण्यासाठी धर्मराज्य कामगार कर्मचारी महासंघ यांनी मा.औद्योगिक न्यायालय,ठाणे येथे यूएलपी क्रमांक ३१९/२०१३ व भारतीय कामगार कर्मचारी महासंघ या संघटनेने युएलपी क्रमांक ३६६/२०१३ दाखल केली आहे. सद्यस्थितीत सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) हे खरे नाही.

यासंदर्भात खोपोली पोलीस ठाणे यांचेकडून दिनांक ०२/०६/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या अहवालानुसार अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे दिसुन येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वारजे माळवाडी (जि.पुणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे, गुन्हेगारींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(१२) १०५०५५ (१२-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारजे माळवाडी (जि.पुणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैध धंदे, गुन्हेगारी घटना, खुन, दरोडे, गॅस-डिझेल चोरी, वाटमारी, वाहनांची जाळपोळ, लैंगिक अत्याचार आणि तत्सम गुन्हेगारीमध्ये लक्षणीय वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्हेगारीमध्ये लक्षणीय वाढ झाली असतांना वारजे पोलीस ठाण्याकडून ठोस कारवाई होत नसल्याने माहे डिसेंबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यामध्ये वा त्यादरम्यान मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना लेखी पत्राद्वारे लक्ष घालण्याबाबत कळविले असतांना अद्यापपर्यंत कोणतीही प्रभावी कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारज्यातील रामनगरमध्ये टोळक्यांकडून कष्टकऱ्यांच्या गाड्या फोडून दहशत निर्माण केली असून दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास २४ तासामध्ये घडलेल्या दोन घटनांमध्ये ५० ते ६० गाड्यांची तोडफोड करून लाखो रूपयांचे नुकसान झाले असून या भागातील घरफोड्या, सोनसाखळी, वाहनचोरीच्या घटना नित्याच्याच झाल्या असून दररोज दिवसाढवळ्या एखाद् दुस-या खुनाच्या घटनाही घडत असल्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढती गुन्हेगारी आणि अवैध धंद्याना पायबंद घालण्यासाठी शासनस्तरावर कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१८) :** (१) पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सन २०१६ व २०१७ मध्ये घडलेल्या गुन्ह्यांची तुलनात्मक माहिती :-

| गुन्ह्याचा प्रकार | सन २०१६ | सन २०१७ | वाढ/घट |
|---|---|---|---|
| खून | ८ | १ | ७ ने घट |
| दरोडा | २ | २ | ० |
| गॅस/डिझेल चोरी | ० | ० | ० |
| जबरी चोरी | २२ | १६ | ६ ने घट |
| वाहन जाळपोळ | २ | १ | १ ने घट |
| लैंगिक अत्याचार | ३८ | ३२ | ६ ने घट |

तुलनात्मक दृष्ट्या दाखल गुन्ह्यांमध्ये घट झाल्याचे दिसून येते.

सन २०१६ व २०१७ मध्ये दाखल करण्यात आलेल्या केसेसची माहिती :-

| गुन्ह्याचा प्रकार | सन २०१६ | सन २०१७ | वाढ/घट |
|---|---|---|---|
| अवैध दारु धंदा | ३१ | ४२ | ११ वाढ |
| जुगार | ३ | ४ | १ वाढ |

तुलनात्मक दृष्ट्या केसेस दाखल करण्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

(२) माहे डिसेंबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यामध्ये वा त्यादरम्यान मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी लेखी पत्राव्दारे लक्ष घालण्याबाबत कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत.

गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी एका संघटीत टोळीचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली असून, ३ इसमांचेविरुध्द एम.पी.डी.ए. अंतर्गत तसेच २६ इसमांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

(३) दि.१५/०१/२०१८ व दि.१६/०१/२०१८ रोजी रामनगर भागात घडलेल्या दोन घटनामध्ये २० ते २५ गाड्यांची तोडफोड होऊन नुकसान झालेले आहे. त्याबाबत वारजे माळवाडी पो.स्टे. येथे गु.र.नं. २७/१८ भा. दं. वि. कलम १४१, १४३, १४४, १४७, १४९, ४२७ आर्म ॲक्ट कलम ४,२५ मु.पो. ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ व वारजे माळवाडी पो.स्टे.गु. र.नं.३०/१८ भा.दं.वि. कलम ३९५, १४१, १४३, १४४,१४७, १४८, १४९, ४२७, ५०४ आर्म ॲक्ट कलम ४, २५ मु. पो. ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ व क्रिमिनल लॉ. अमेंडमेंट ॲक्ट कलम ७(१) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असून दोन्ही गुन्ह्यात एकूण १४ आरोपी अटक करण्यात आले आहेत.

तसेच रामनगर भागात सोनसाखळी चोरीची १ घटना घडलेली असून, घरफोडी व खुनाची एकही घटना घडलेली नाही.

नागरिकांमध्ये असुरक्षिततेची कोणतीही भावना निर्माण झालेली नसून त्यांचे दैनंदिन जीवन व व्यवहार सुरळीत चालू आहेत.

(४) वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोनसाखळी चोरी, घरफोड्या, वाहन चोरी या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच एका संघटित टोळीचे विरुध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात

आली असून ३ इसमांचे विरुध्द एम.पी.डी.ए. अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच २६ इसमांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात नॅशनल स्टॉक एक्स्चेंज आणि बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज यांच्याकडील डिमॅट धारक ग्राहकांची खाजगी माहिती बोगस स्टॉक ब्रोकर कंपन्यांना पुरविल्यामुळे कोट्यवधी रुपयांची झालेली फसवणुक**

**(१३) १०५०५६ (०६-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नॅशनल स्टॉक एक्सचैंज आणि बॉम्बे स्टॉक एक्सचैंज यांच्याकडील डिमॅट धारक ग्राहकांचे खाजगी मोबाईल क्रमांकासह कागदपत्रे बोगस स्टॉक ब्रोकर कंपन्यांना पुरविले जात असल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या माध्यमातून विविध नावाने प्राप्त एसएमएस द्वारे स्टील एक्स्चेंज, साईबाबा फायनान्स सारख्या अनेक स्टॉक्स ची खोटी माहिती देऊन शेअर मार्केट मध्ये गुंतवणूकदारांची माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यासह इंदौर, मध्यप्रदेश सह परराज्यातून डिमॅट धारक ग्राहकांचे खाजगी मोबाईल क्रमांकावर वारंवार संपर्क करून मानसिक त्रासासह आर्थिक फसवणूकीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा बोगस स्टॉक ब्रोकर कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच नॅशनल स्टॉक एक्स्चेंज आणि बॉम्बे स्टॉक एक्स्चैंज यांच्याकडून डिमॅट धारक ग्राहकांचे मोबाईल क्रमांक व कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
राज्यात नॅशनल स्टॉक एक्स्चैंज आणि बॉम्बे स्टॉक एक्स्चैंज यांच्याकडील डिमॅट धारक ग्राहकांचे खाजगी मोबाईल क्रमांकासह कागदपत्रे बोगस स्टॉक ब्रोकर कंपन्यांना पुरविल्यामुळे गुंतवणुकदारांची कोट्यावधी रूपयांची फसवणुक झाल्याबाबत राज्यामध्ये कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हनवत खेड (ता.जळगाव जामोद, जि.बुलढाणा) येथील अनुदानित प्राथमिक आदिवासी आश्रमशाळेतील कर्मचा-यांनी सामुहिक आत्महत्येचा केलेला प्रयत्न**

**(१४) १०५५२० (०६-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हनवत खेड (ता.जळगाव जामोद, जि.बुलढाणा) येथील अनुदानित प्राथमिक आदिवासी आश्रमशाळेतील पाच कर्मचा-यांनी विष प्राशन करुन सामुहिक आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाकडुन चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) सदर कर्मचारी हे स्वयंपाकी म्हणून काम करीत होते त्यांना दिलेल्या एका मदतनिसाला आश्रमशाळेचे पदाधिकारी, शिक्षक व मुख्याध्यापक हे त्यांची खाजगी कामे सांगत असल्याने, मदतनिस हे त्यांना कामात मदत करु शकत नव्हते. त्यामुळे अतिरिक्त कामाच्या भारामुळे त्यांची शारिरिक व मानसिक स्थिती खराब झाली. याबाबत मुख्याध्यापक व वसतीगृह अधीक्षक यांना वेळोवळी पत्र देऊनही कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याने त्यांनी विषारी द्रव्ये प्राशन केले.

सदर कर्मचाऱ्यांवर प्राथमिक उपचार करुन ग्रामीण रुग्णालय, जामोद व त्यांनतर ग्रामीण रुग्णालय, खामगांव येथे उपचारासाठी दाखल केले होते. पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात माथाडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत**

**(१५) १०५६७८ (१२-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर),**

**श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध माथाडी मंडळांवर अध्यक्ष (चेअरमन) आणि सचीव (सेक्रेटरी) यांची पूर्णवेळ नेमणूक करणे, माथाडी मंडळाच्या कार्यालयीन सेवेत माथाडी कामगारांच्या मुलांना प्राधान्य देणे, माथाडी मंडळावर युनियनच्या सभासद संख्येच्या प्रमाणात सदस्यांच्या नेमणूका करणे आदी मागणीसंदर्भात कामगार संघटनांनी दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा. कामगारमंत्री यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.कामगार मंत्री संबंधित अधिका-यांची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन माथाडी कामगारांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील माथाडी कामगारांच्या विविध प्रश्नांवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, तद्नुसार प्रतिकुल परिस्थितीत काम करणा-या माथाडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी अद्यापपर्यंत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सन्माननीय विधान सभा सदस्य यांच्या दि.०३/०१/२०१८ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित अधिका-यांसमवेत दि.८/१/२०१८ रोजी मा. मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे.

माथाडी मंडळांवरील चेअरमन व सचिवांची रिक्त पदे भरण्यासाठी अतिरिक्त पदांना आकृतीबंधात मंजूरी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. सहाय्यक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी या पदावर अनुक्रमे ११ व ८ उमेदवारांच्या नियुक्तीसाठीची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनाला करण्यात आली आहे. सदर उमेदवारांना लवकरच नियुक्ती प्रदान करण्यात येणार आहे.

माथाडी कामगारांच्या मुलांना प्राधान्य देणे व युनियनच्या सभासद संख्येच्या प्रमाणात संस्थांच्या नेमणूका करण्यासंदर्भातील बाब विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील, परदेशी रोजगाराच्या शोधात असणाऱ्या युवक-युवती यांचेकरिता ओव्हरसीज प्लेसमेंट सेंटर उभारण्याबाबत

**(१६) १०५७१९ (२३-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील, परदेशी रोजगाराच्या शोधात असणाऱ्या युवक-युवती यांचेकरिता शासनाच्या वतीने ओव्हरसीज प्लेसमेंट सेंटर उभारण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतच्या निर्णयाला केंद्र सरकारने देखील मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील कोणत्या शहरांमध्ये व कधीपर्यंत सदरचे प्लेसमेंट सेंटर उभारण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, सदरच्या प्लेसमेंट सेंटर मार्फत परदेशात जाणाऱ्या युवक-युवती करिता कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत,

(५) असल्यास, सदरची प्लेसमेंट सेंटर उभारण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३१-०७-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

याबाबत राज्य स्तरावर प्लेसमेंट सेंटर उभारण्याच्या अनुषंगाने धोरणात्मक प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(३) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक ०४/०१/२०१७ च्या शासन निणर्यान्वये सर्व प्रथम मुंबई व नागपूर या दोन जिल्ह्यांच्या ठिकाणी ओव्हरसीज प्लेसमेंट आणि स्किल डेव्हलपमेंट सेंटर सुरू करण्याचे नियोजित असून विभागाच्या धोरणात्मक प्रस्तावास मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्लेसमेंट सेंटर उभारण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) व (५) परदेशात नोकरीकरिता जाण्यास इच्छूक व पात्र असलेल्या उमेदवारांना परदेशात रोजगार प्राप्त होण्यासाठी सामोरे जावे लागणाऱ्या सर्व समस्यांवर समाधानकारक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने व राज्यातील कुशल/अर्धकुशल/ अकुशल मनुष्यबळाच्या परदेशातील मागणीनुसार इच्छूक उमेदवारांचा पुरवठा करण्याचे नियोजित असून, याबाबतचा धोरणात्मक प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विवाह जुळवणा-या विवाह संबंधीत संकेतस्थळावर बनावट रुपरेखा बनवून ठाणे जिल्ह्यातील महिला व पुरुषांची फसवणूक केल्याबाबत

**(१७) १०६०४१ (१२-०४-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विवाह जुळवणा-या विवाह संबंधीत संकेतस्थळावर बनावट रुपरेखा बनवून त्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यात मागील दोन वर्षात एकुण १०२ महिला व पुरुषांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बनावट रुपरेखा बनवून महिलांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या ४ नायजेरियन नागरिकांना पोलीसांनी अटक केली तसेच बड्या राजकीय नेत्यांचा नातेवाईक असून म्हाडामध्ये अधिकारी असल्याची बतावणी करत एका विवाह संबंधीत संकेतस्थळावरून कळवा येथील महिलेशी ओळख वाढवून तिला रुपये २० लाख रुपयांनी फसविणा-या एकाला ठाणे पोलीसांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या फसवणुकीच्या घटना कमी करण्यासाठी महिला व बाल विकास मंत्रालयाकडून विवाह संबंधीत संकेतस्थळावर कडक निर्बंध घातले असतानाही हे संकेतस्थळ सर्व नियमांचे उल्लघंन करीत असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार अद्यापपर्यंत किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे

मेट्रोमोनियल वेबसाईटच्या माध्यमातून फसवणूक केल्याबाबत ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०१६ व सन २०१७ मध्ये एकूण ६ गुन्हे दाखल आहेत व ठाणे ग्रामीण कार्यक्षेत्रांतर्गत सन २०१७ मध्ये एकूण २ गुन्हे दाखल आहेत.
(२) या प्रकरणी एकूण ४ नायजेरीयन नागरीकांना अटक केल्याची बाब खरी आहे. मात्र कळवा पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यात तपासादरम्यान आरोपीने बड्या राजकीय नेत्यांचा नातेवाईक असून म्हाडामध्ये अधिकारी असल्याची बतावणी करून फसवणुक केल्याबाबत तपासात माहिती मिळाली नाही.
(३) भारत सरकारच्या सूचना व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० व त्याखालील नियमान्वये मॅट्रीमोनियल वेबसाईट्स यांना दिनांक ६.६.२०१६ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.
(४) व (५) सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालया अंतर्गत पुढीलप्रमाणे एकूण ६ गुन्हे दाखल असून एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

१. कळवा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४५३/२०१७, भा.दं.वि. कलम ४२० अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु आहे.

२. कासारवडवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८४/२०१७, भा.दं.वि. कलम ४२० सह कलम ६६ आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद असून सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

३. वर्तकनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३३१/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह कलम ६६ (ड) आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु आहे.

४. वागळे इस्टेट पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६३/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह कलम ६६ (क) (ड) आयटी ॲक्ट २००० व परकिय नागरिक कायदा कलम ३, १४ अन्वये गुन्हा नोंद असून सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

५. डोंबिवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०६/२०१६, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह कलम ६६ (क) (ड) आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद असून सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

६. डोंबिवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३१/२०१६, भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ३४ सह सुधारित २००८ चे कलम ६६ (क) (ड) आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद असून सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच, सदर प्रकरणी ठाणे ग्रामीण कार्यक्षेत्रांतर्गत पुढीलप्रमाणे एकूण २ गुन्हे दाखल आहेत.

१. काशिमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३१२/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु आहे.

२. नयानगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३६९/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गोळवशी गावाच्या (जि.रत्नागिरी) जिल्हा परिषद नळपाणी योजनेचे ठेकेदार यांची ऑनलाईन पाईन खरेदीत झालेली फसवणूक**

**(१८) १०६०९० (१२-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोळवशी गावाच्या (जि.रत्नागिरी) जिल्हा परिषदेच्या नळपाणी योजनेचे ठेकेदार श्री.घोरपडे यांनी चेन्नई येथील एस.आर. गोवर्धनास एजन्सी प्रोप्रायटर यांच्याकडून नळपाणी योजनेला लागणा-या पाईपची ऑनलाईन खरेदी केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त एस.आर. गोवर्धनास एजन्सी प्रोप्रायटरशी पाईप खरेदीबाबत करार करून रुपये सात लाखांचे ऑनलाईन पेमेंट करण्यात येऊनही संबंधित एजन्सीने पाईप न पुरविता ठेकेदाराला फसविल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ठेकेदार श्री. घोरपडे यांनी रुपये सात लाखांची ऑनलाईन फसवणूक झाल्या प्रकरणी कोंड्ये पाल्येवाडी लांजा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार फसवणूक करणा-या दोषी कंपनीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) खरेदीचा खरेदी करार झालेला नाही. तथापि फोनवर बोलणी करुन व्यवहार ठरला. त्यानुसार एनईएफटी व्दारे पैसे ट्रान्सफर करण्यात आले. परंतू ठेकेदाराला पाईप न पुरविल्याने ठेकेदाराची फसवणूक झाली आहे. त्यास अनुसरुन ठेकेदाराने पोलीस ठाणे, लांजा येथे तक्रार नोंदविली आहे.
(४) ठेकेदाराने दाखल केलेल्या तक्रारीस अनुसरुन लांजा पोलीस स्टेशन, जि.रत्नागिरी येथे गु. र. नं.०२/२०१८ भा. द. वि. कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) जेऊर व जिंती येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत**

**(१९) १०६२७२ (१४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा मतदार संघातील (जि.सोलापूर) जेऊर व जिंती येथे पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता असल्याने नवीन पोलीस ठाणे निर्माण करणे व पोलीस ठाण्याची इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याची बाब विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील पोलीस ठाणे निर्माण करणे व इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस अधिक्षक, सोलापूर यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१८) :** (१) व (२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या आस्थापनेवर जेऊर व जिंती येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर केले असता त्यावर वित्त विभागाने त्यांच्या दिनांक २५.०५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार राज्य पोलीस दलाचा आकृतीबंध निश्चित करुन प्रस्ताव फेरसादर करावा, असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि उपरोक्त जेऊर व जिंती पोलीस ठाण्यांच्या इमारत बांधकामाबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंदखेडराजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) दुसरबीड येथील पोलीस चौकी बंद असल्याने अवैध व्यवसायात झालेली वाढ**

**(२०) १०६८२८ (०७-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुसरबीड (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील पोलीस चौकी गत चार ते पाच महिन्यापासून बंद असल्याने अवैध व्यवसाय वाढले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पोलीस चौकी बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर पोलीस चौकी तातडीने सुरू करून अवैध व्यवसायांना प्रतिबंधीत करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही ,दुसरबीड येथे पोलीस चौकी नसुन सन १९९९ मध्ये सदर ठिकाणी पोलीस मदत केंद्र सुरु करण्यात आले आहे व सदर पोलीस मदत केंद्र कार्यान्वित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येहळेगाव गवळी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे तरुणाने आत्महत्या केल्याचे प्रकरण**

**(२१) १०६८८२ (११-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येहळेगाव गवळी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे ३० वर्षीय श्री.भिमराव जळवा धुळे या तरुणाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र ही आत्महत्या नसून आत्महत्येस प्रवृत्त करणा-या विरुध्द गुन्हा दाखल होईपर्यंत प्रेत ताब्यात घेण्यास या तरुणांच्या नातेवाईकांनी नकार दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर तरुणास आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी बाळापूर पोलीस स्टेशन आकस्मात मृत्यू ५२/२०१७ कलम १७४ सीआरपीसी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील फरार महिला आरोपी हिची मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केल्याने तिला नॉमीनल अटक करुन जामीनावर सोडले आहे. तसेच सदर गुन्ह्यातील दुसऱ्या फरार आरोपीनी अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी अर्ज केला असता त्यास जामीन मिळू नये म्हणून मा.अपर सत्र न्यायालय, हिंगोली यांना अहवाल सादर केल्याने सदर फरार आरोपीचा अटकपूर्व जामीन नामंजूर करण्यात आला. तरी या प्रकरणी फरार आरोपीचा शोध घेऊन त्यांना अटक करणे व अधिक पुरावा गोळा करणेकरिता पोलीस तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कलगांव (जि.हिंगोली) येथील एका व्यक्तीने केलेली आत्महत्या**

**(२२) १०६९१६ (१२-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कलगांव (ता.जि.हिंगोली) येथील श्री.दिलीप वामन पवार यांनी आत्महत्या केल्याप्रकरणी तणाव निर्माण झाला असुन पोलीसांच्या त्रासामुळे मानसिक तणावाखाली त्यांनी आत्महत्या केली असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे पोलीस कर्मचारी व अधिका-यांविरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर पारधी समाजाच्या वतीने धरणे करुन निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पोलीसांसह संबंधितांवर गुन्हे दाखल करावे अशी मागणी मयताच्या नातेवाईकांनी केली अन्यथा शवविच्छेदन करु देणार नाही असे सांगितल्यावर ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) दि. ०६.०१.२०१८ रोजी आत्महत्या केली, हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या कार्यालयासमोर पारधी समाजाच्या वतीने धरणे आंदोलन करुन, निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना दिल्या आहेत.

(३) व (४) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथे गुरनं ०७/१८ कलम ३०६, १४३, ४४७, ५०६ भादंवि व सह कलम ३(१)(एस), ३(१)(आर) अजाजअप्रका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यातील तपासात दोन पंचासमक्ष मयताचे इन्क्वेस्ट पंचनामा करुन सरकारी दवाखान्यात पीएम साठी पाठविले. घटनास्थळाचा पंचनामा करुन व साक्षीदारांची विचारपुस करुन त्यांचे जाबजबाब नोंदविले. वैद्यकिय अधिकारी यांनी मृत्यूचे कारण “HANGING” असा दिला आहे. सदर गुन्ह्यात ८ आरोपींना अटक करण्यात आली. उर्वरित ३ आरोपींनी अटकपुर्व जमानत मिळविली आहे. गुन्ह्यातील सर्व आरोपी जामिनावर आहेत. या प्रकरणी अधिक पोलीस तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक वनीकरण विभाग (पंढरपूर, जि.सोलापूर) येथे सहाय्यक लागवड अधिकाऱ्यांचा झालेला संशयास्पद मृत्यू**

**(२३) १०७१२५ (११-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक वनीकरण विभाग (पंढरपूर, जि.सोलापूर) येथे सहाय्यक लागवड अधिकारी म्हणून कार्यरत असलेले राजू श्रावण यांचे दिनांक ९ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास संशयास्पद मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या मृत्यूची चौकशी करण्याबाबत त्यांच्या नातेवाईकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २६ ऑक्टोबर २०१७ रोजी वा त्यासुमारस लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) हे, खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) याप्रकरणी आरोपी ट्रकचालकाने हयगईने, अविचाराने, परिस्थितिचा अंदाज न घेता ट्रक चालविल्याने श्री.कडू यांचे अंगावरून चाक गेल्यामुळे ते गंभीर जखमी होवून मयत झाल्यामुळे आरोपीविरूध्द दि.१०/०२/२०१७ रोजी पंढरपूर पोलीस ठाण्यामध्ये गु.र.क्र.११४/२०१७ भा.दं.वि.स. कलम २७९, ३०४अ, ३३७, ३३८ व मो.व्ही.ॲक्ट कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबत

**(२४) १०७१५१ (०६-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पोलीस प्रशासनावरील ताण कमी होण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करावी अशी मागणी गत १५ वर्षापासून तेथील नागरीकांकडून केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१८) :** (१) व (२) कोल्हापूर पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासंदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मुद्दयांच्या अनुषंगाने नव्याने प्रस्ताव प्राप्त झाला आहे व प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) नगर-दौंड रस्त्यावरील चिखली घाटातील पोलीस चौकी बंद असल्याबाबत

**(२५) १०७१९९ (०५-०४-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) नगर दौंड रस्त्यावरील चिखली घाटातील पोलीस चौकी बंद असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पोलीस चौकी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१८) :** (१) व (२) बेलवंडी पोलीस स्टशनच्या हद्दीतील नगर दौंड रस्त्यावर चिखली घाट येथे वाहने अडवून चोऱ्या होत असल्याने तसेच बकरी ईद चे काळात येथे नाकाबंदी लावण्यात येत असल्याने रात्रीचे वेळी नाकाबंदीचे पोलीस कर्मचारी यांनी चिखली

घाट येथे थंडीचे तसेच पावसात उभे राहण्यासाठी जागा नसल्याने तात्पुरते स्वरुपात पोलीस निवारा केंद्र उभे करण्यात आले आहे. परंतु सदर ठिकाणी पोलीस चौकी मंजुर नाही.
(३) व (४) प्रश्‍न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा तालुक्यात (जि.अहमदनगर) दरोड्याच्या घटना घडत असल्याबाबत**

**(२६) १०७२३८ (०५-०४-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा तालुक्यात (जि.अहमदनगर) माहे सप्टेंबर, २०१७ पासून दरोड्याच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार श्रीगोंदा तालुक्यातील दरोड्यांचा बंदोबस्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१), (२) व (३) माहे सप्टें, २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत श्रीगोंदा तालुक्यात दरोड्याचे ३ गुन्हे दाखल असून तीनही गुन्हे उघडकीस आलेले आहेत. यापैकी २ गुन्हे तांत्रिक स्वरूपाचे असून १ गुन्हा प्रत्यक्ष घडलेला आहे.

दि.३०/०१/२०१८ रोजी फिर्यादी हे त्यांचे सोन्याचे दुकान बंद करून जात असताना आरोपींनी त्यांना खाली पाडून मिरचीपुड टाकून त्यांचे हातातील रू.११,७५,०००/- किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने असलेली बॅग बळजबरीने चोरून नेल्याबाबत बेलवंडी पो.स्टे.येथे गुरनं २२/२०१८ भादंवि ३९४, ३४, ३९५ प्रमाणे ५ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून यापैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून रू.३,२१,४००/- किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.सद्यस्थितीत गुन्हा तपासावर आहे.

श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे दाखल गुरनं ५३/२०१८ आणि गुरनं ७२/२०१८ मध्ये गुन्हयातील फिर्यादी यांनी तालुका दंडाधिकारी यांचे समक्ष प्रतिज्ञापत्र दिले आहे की, सदरचा गुन्हा केवळ गैरसमजुतीने नोंदविला गेला असून आरोपींविरूध्द त्यांची काहीएक तक्रार राहिलेली नाही. सबब गुरनं ५३/२०१८ व ७२/२०१८ बाबतची 'क' वर्ग समरी मंजूरीकरीता कागदपत्रे न्यायालयात सादर करण्याची कार्यवाही सूरू आहे.

दरोड्या सारखे गुन्हयांना प्रतिबंध होण्यासाठी महत्वाचे ठिकाणी नाकाबंदी, रात्रगस्त करण्यात येत आहे. तालुक्यातील क्रियाशील गुन्हेगारांची माहिती काढून त्यांचे वास्तव्याचे ठिकाणी कोंबिग ऑपरेशन करून सप्टें, २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत अहमदनगर जिल्हयात ४९ दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळया पकडण्यात आल्या असून त्यांचेविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच या प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**नेवासा तालुक्यात (जि.अहमदनगर) गावठी कट्टे विकणारी टोळी सक्रिय असल्याबाबत**

**(२७) १०७८७७ (१२-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा तालुक्यात (जि.अहमदनगर) गावठी कट्ट्याचा वापर किरकोळ भांडणांत होत असल्याचे दिसून येत असून विविध गावात गावठी कट्टे विकणारी टोळी सक्रिय असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टोळीला पकडण्याकरिता पोलीस प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) व (२) नेवासा तालुक्यातील शनि शिंगणापूर येथे शेती खरेदीचे हिस्सा वाटपाच्या कारणावरून हत्या झाली आहे. सदर प्रकरणी शनि शिंगणापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४८/२०१७ भा.दं.वि.कलम ३०२, ५०६, १४३, १४७, १४८, १४९, १२० (ब), २०१ सह हत्यार कायदा कलम ३/२५, ४/२५, सह महा.पो.का. कलम ३७ (१), (३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे दि.२१/१२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी ५ आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

नेवासा तालुक्यात गावठी कट्टे विकणारी टोळी सक्रिय नाही. परंतु अशा प्रकारच्या टोळ्या आढळून आल्यास, सदर टोळ्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

(३) विलंब झालेला नाही.

---

**भांडूप (प.) (जि.मुंबई उपनगर) येथील व्यापारी व फेरीवाले यांच्याकडून स्थानिक पोलीस हप्तावसूल करीत असल्याबाबत**

**(२८) १०७९०२ (१२-०४-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (प.) (जि.मुंबई उपनगर) येथील स्थानिक व्यापारी व फेरीवाले यांच्याकडून स्थानिक पोलीस हप्तावसूल करीत असल्याबाबतच्या अनेक तक्रारी स्थानिक लोकप्रतिनीधींकडे प्राप्त झाल्या असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे चौकशी व कारवाई व्हावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भांडूप (प.) येथील पोलीस ठाण्यामध्ये तक्रारीं दाखल करण्यासाठी गेलेल्या स्थानिक नागरीकांना तसेच स्थानिक आमदारांनाही पोलीसांकडून अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचेही सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन भांडूप (प.) येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

परंतु, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना निवेदन दिलेले आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना दिलेल्या निवेदनात स्थानिक नागरिकांना अपमानास्पद वागणुक व लोकप्रतिनिधी हे विचारणा करायला गेल्यावर त्यांना योग्य ती उत्तरे दिली जात नाही असे नमुद केले आहे.

(३) नमुद निवेदनाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच पोलीस ठाणेस तक्रार देण्यास येणा-या प्रत्येक नागरिकांशी सौजन्याने वागावे, त्यांच्या तक्रारी ऐकुण त्यांचे निरसन करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच, परेडवर वेळोवेळी मार्गदर्शन करुन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी प्रत्येकाला सौजन्याने वागणुक देण्याबाबत समज दिलेली आहे. परंतु, नमुद निवेदनात कोणत्या अधिकारी अगर कर्मचारी यांचे नावाचा उल्लेख केलेला नसल्याने त्यामुळे कोणतीही कारवाई केली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील ॲसिड हल्ल्यातील पीडितांची रक्कम प्रलंबित ठेवल्याने संस्थेच्या पदाधिका-यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२९) १०८८०६ (१२-०४-२०१८). कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सात ॲसिड हल्ल्यांतील पीडितांच्या परवानगीशिवाय त्यांची छायाचित्रे एका प्रसिध्द संस्थेने संकेतस्थळावर अपलोड करुन त्यांच्या मदतीसाठी पैसे जमा करुन ती रक्कम पीडितांना अद्यापपर्यंत दिली नसल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ॲसिड हल्ल्यातील पीडितांची रक्कम लांबवल्याने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

अशा प्रकारचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. परंतु, तपासांती तो खोटा असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी बांद्रा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ६६२/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ अन्वये नोंद करण्यात आला होता. नमुद गुन्ह्याचा तपास पुर्ण करण्यात आला असुन, फिर्यादी

यांच्या एनजीओ ची आरोपीच्या एनजीओ बरोबर स्पर्धा असल्याने आरोपीच्या एनजीओ संस्थेला बदनाम करण्याच्या उद्देशाने त्यांचे विरोधात खोटा गुन्हा दाखल केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वडगावशेरी (ता.हवेली, जि.पुणे) भागात आधार केंद्र सुरु नसल्याबाबत

**(३०) १०९०२५ (१८-०४-२०१८). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगावशेरी (ता.हवेली, जि.पुणे) भागातील आधार कार्ड काढण्यासंदर्भात राज्यशासनाकडे वारंवार मागणी करून सुद्धा आधार केंद्र सुरु नसणे, नादुरुस्त मशीनमुळे सामान्य जनतेला नाहक त्रास होत असणे, दुसऱ्या भागातील केंद्रावर गेले असता तेथील आधार केंद्र चालकाकडून पैशाची मागणी होत असणे इ. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील किती आधार केंद्र सुरु केली आहेत वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) या भागात २ आधार केंद्र सुरू आहेत. विधानसभा मतदार संघात एकूण १० केंद्रे सुरू आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर शहरात झालेले टोळीयुद्ध

**(३१) १०९५९७ (१४-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात मोमिनपुरा परिसरात कुख्यात इप्पा व नौशाद टोळीकडून जुन्या साथीदारांवर हल्ला करून त्याची हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने शहरात टोळीयुद्ध तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेनंतर गुन्हेगारांना अटक करण्यासाठी गेलेल्या गुन्हे शाखेच्या पथकावर इप्पाच्या टोळीने हल्ला केला व वाहनाचे मोठे नुकसान केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१८) :** (१) नागपूर शहर अंतर्गत पोलीस स्टेशन तहसिल अंतर्गत गरीब नवाज मस्जीद जवळ, अन्वर किराणा स्टोअर्सच्या समोर इप्पा व नौशाद

टोळीकडून जुन्या साथीदारांवर हल्ला करुन त्याची हत्त्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. टोळीवर पोलीस स्टेशन तहसिल अपराध क्र.३४०/१७ कलम ३०७, ५०६ब, ३४ भादंवि सह क्रलम४+२५ आर्म ॲक्ट तसेच कलम ३(i) (ii) (iii) ३ (II) ३(iv) मकोका म.स.गु.नि.का.) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. परंतू शहरात टोळीयुध्द तीव्र होण्याची स्थिती निर्माण झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याप्रकरणी अपराध क्र.३५१/१७ कलम १४३, १४७, १४९, १८६, ३३६, ३५३, ४२७ भादंवि वाढीव कलम ३३२ भादंवि ३ शासकिय मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये आरोपींतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ५ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खाडीमार्गे ठाणे शहरांतर्गत तसेच ठाण्यासह भिवंडी, कल्याण-डोंबिवली आणि वसई-विरार या चार शहरांना जलवाहतुकीने जोडण्याच्या महत्वाकांक्षी योजनेबाबत**

**(३२) ११०६०५ (१७-०४-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाडीमार्गे ठाणे शहरांतर्गत तसेच ठाण्यासह भिवंडी, कल्याण-डोंबिवली आणि वसई-विरार या चार शहरांना जलवाहतुकीने जोडण्याच्या महत्वाकांक्षी योजनेला १०० टक्के निधी केंद्र शासन उपलब्ध करुन देणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई आणि नवी मुंबईला जलवाहतुकीने जोडण्याचा प्रकल्प अहवाल सादर करण्याचे आदेश केंद्र शासनाने दिले असुन यातील ५० टक्के खर्च केंद्र शासन करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही योजनेबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) प्रथम टप्प्यातील वसई-ठाणे-कल्याण अंतर्गत जलवाहतूक बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल दिनांक ०१.०६.२०१८ रोजी भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण, दिल्ली यांच्याकडे महापालिका आयुक्त, ठाणे यांच्यामार्फत सादर करण्यात आला आहे.

तसेच दुस-या टप्प्यातील ठाणे-मुंबई व ठाणे-नवी मुंबई या दोन्ही जलमार्ग वाहतूकीकरीता अनुभवी सल्लागारांकडून सविस्तर अभ्यास व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ठाणे महापालिकेमार्फत दिनांक ०४.०६.२०१८ रोजी द्वितीय देयकाराची निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे बोरी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेत पिक विमा भरणा-या शेतकऱ्यांवर पोलीसांकडून अमानुषपणे लाठी चार्ज करण्यात आल्याबाबत**

**(३३) ११०७८८ (१४-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोरी (जि.परभणी) येथील जिल्हा मध्यवर्ती शाखेमध्ये दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास शेकडो शेतकरी पिक विमा भरण्याकरिता उभे असताना शेतकऱ्यांवर पोलीसांकडून अमानुषपणे लाठी चार्ज करण्यात आलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावेळी अनेक वृद्ध शेतकरी यांच्यावर देखील लाठी चार्ज झाला असून बोरी पोलीस स्टेशनचे श्री गजेंद्र सरोदे यांनी स्वतः वयोवृध्द शेतकरी श्री विष्णू विठ्ठलराव डोंबे यांना अमानुष मारहाण करून त्यांचा पाय फ्रॅक्चर केल्याची तक्रार मा.पोलीस अधीक्षक परभणी यांच्याकडे करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास अद्यापपर्यंत संबंधित श्री सरोदे यांच्यावर कोणतीही कारवई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१८) :** (१) नाही. तथापि, बँकेत पिक विमा भरणाकरिता आलेल्या शेतकऱ्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला गर्दी जास्त असल्यामुळे दोन काऊंटर सुरु करण्यास सांगितले असता बँकेन काही तांत्रिक कारणास्तव सुरु करण्यात येणार नसल्याचे सांगितल्याने, शेतकऱ्यांचे समाधान न झाल्याने शेतकऱ्यांनी बँकेसमोरील रस्त्यावर येऊन रास्ता रोको करुन आंदोलन केले. याबाबत स्थानिक पोलीस घठनास्थळी आल्यानंतर त्यांनी सदरचे आंदोलन सनदशिर मार्गाने सोडविण्यासाठी बँक मॅनेजर व शेतकऱ्यांना आश्वासन दिले. परंतू शेतकऱ्यांनी त्यांचे काहीही न ऐकता रस्त्यावरील एस.टी. बस व बँकेवर दगडफेक सुरु करुन शासकीय मालमत्तेचे नुकसान करण्यास सुरुवात केली. त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलीसांनी जमावाला पांगविण्याकरिता सौम्य लाठीचार्ज केला.

(२) नाही. सदर तक्रार पोलीस स्टेशन बोरी येथे प्राप्त झालेली आहे. तर पिक विमा भरण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांवर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कर्मचारी व एजंट यांच्या संगणमताने शेतकऱ्यांवर मारहाण झाल्याबाबतचा तक्रार अर्ज पोलीस अधीक्षक, परभणी यांचेकडे प्राप्त आहे.

(३) व (४) उपविभागीय पोलीस अधिकारी, जिंतूर, सहायक पोलीस निरिक्षक, बोरी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच मॅनेजर यांनी शेतकऱ्यांना रास्तारोको बंद करुन त्यांच्या मागण्या कायदेशीर मार्गाने सोडविणसाठी योग्य ती मदत करु असे सांगितले. शेतकऱ्यांनी केलेल्या दगडफेकीत ३ पोलीस जखमी झाले. तसेच उपरोक्त घटना टाळण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला. तसेच एस.टी. बस चालकाने दिलेल्या फिर्यादीवरुन १०० ते १२५ शेतकऱ्यांविरुध्द बोरी पोलीस स्टेशन येथे गुरनं १५७/२०१७ कलम १४३, ३४१ भादंवि व सह कलम ०३ सार्वजनिक

नुकसान प्रतिबंधक अधि. व सह कलम १३५ मु.पो.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यामध्ये एकूण २५ आरोपींना अटक करण्यात आली असून २१ आरोपींना जामीन मंजूर करण्यात आला आहे व उर्वरित ४ आरोपींना न्यायालयाचे निर्देशानुसार कोर्टात हजर रहाण्याची समज दिली आहे. उपरोक्त केलेल्या चौकशी वरुन सहायक पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन, बोरी यांनी कोणतीही चूक केल्याचे आढळून आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा तालुका (जि.सोलापूर) येथील भिमा नदीकाठच्या परिसरासह ब्रम्हपूरी, माचणूर ईला येथे चोरींच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(३४) ११०९९१ (१२-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा तालुका (जि.सोलापूर) येथील भिमा नदीकाठच्या परिसरासह ब्रम्हपूरी, माचणूर येथील गांवात शेतकऱ्यांचे कृषिपंप, केबल, शेतीचे साहित्य चोरीला जाणाऱ्या घटनेमध्ये दिवसें-दिवस वाढ होत असल्याचे दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त चोरीप्रकरणी शेतकऱ्यांनी वेळोवेळी स्थानिक पोलीस प्रशासनाला तक्रार व विनंती करून देखील अद्याप पोलीस प्रशासनाला या चोरींना प्रतिबंधीत करण्याबाबत यश आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक पोलीस प्रशासन यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी अद्यापी कोण-कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
या प्रकरणी मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल नाही.
(३) सदर परिसरात चोरीच्या घटना घडू नये याकरिता मंगळवेढा पोलीसांकडून रात्रीच्या वेळी गुन्हेगारांना चेक करुन त्यांच्यावर लक्ष ठेवले जात आहे. ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी गस्त ठेवण्यात येत आहे. हायवे पेट्रोलिंगद्वारे गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यात येत आहे. ग्रामीण भागातील ग्रामस्थांना सुरक्षा रक्षक म्हणून नेमण्यात आले आहे. ऑलआउट व कोंम्बींग ऑपरेशनद्वारे गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्याबाबत प्रभारी अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील बस स्थानकामध्ये भक्तांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा उपलब्ध नसल्याबाबत**

**(३५) १११९३७ (११-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील बस स्थानकामध्ये कायम भाविक भक्तांची वर्दळ असून त्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा उपलब्ध नसल्याने दिवसें-दिवस प्रवाशांच्या चोरीच्या व लूटीच्या घटना वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंढरपूर बस स्थानकामध्ये स्वतंत्र पोलीस चौकी बांधण्याबाबत व कायम पोलीस कर्मचारी नियुक्ती करणेसाठी अनेक दिवसांपासून प्रवाशांची मागणी असतांनाही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत पोलीस प्रशासन यांनी बस स्थानकातील विविध गुन्हे व चोरीच्या घटनांना प्रतीबंधीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) पंढरपूर बस स्थानकात सन २०१७ मध्ये चोरीच्या ११ घटना व सन २०१८ मध्ये चोरीची १ घटना घडलेली आहे.
(२) हे खरे नाही.

पंढरपूर बस स्थानकात एस.टी महामंडळातर्फे बांधण्यात आलेले पोलिस मदत केंद्र असून तेथे दोन कायमस्वरूपी पोलिस कर्मचारी नेमलेले आहेत.
(३) पंढरपूर बस स्थानकात विविध गुन्हे व चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.

| वर्ष | सीआरपीसी कलम १०७ | सीआरपीसी कलम १०९ | मपोकाक ११०/११७ |
|---|---|---|---|
| २०१७ | ८ | १४७ | ४७ |
| २०१८ मार्च अखेर | २ | ४२ | ३ |
| एकुण | १० | १८९ | ५० |

पंढरपूर एसटी बस स्थानकामध्ये पोलीस प्रशासनातर्फे २४ तास पेट्रोलिंगसाठी कायमस्वरुपी २ पोलीस कर्मचारी नेमलेले आहे. प्रत्येक एकादशी, बाजार, सन-उत्सव व लग्नसराईच्या कालावधीत अतिरीक्त पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी नेमले जातात. तसेच अधून मधून गुन्हे अन्वेषण विभागाचे कर्मचारी पेट्रोलिंगसाठी नेमले जातात व प्रवाशांना चोरा पासून सावध राहण्याच्या सुचना देण्यात येतात.
(४) विलंब झालेला नाही.

---

## मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील चिवरा व उमरवाडी येथील शेतकरी आत्महत्या प्रकरणाच्या चौकशीबाबत

**(३६) १११३९५ (१२-०४-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिवरा (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील शेतकरी एकनाथ शेजुळ व उमरवाडी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील शेतकरी डिगांबर धंदरे यांनी माहे डिसेंबर, २०१७ अखेर आत्महत्त्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील आत्महत्त्येची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व तद्नुसार आत्महत्त्येस जबाबदार असणा-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) एकनाथ शेजुळ यांनी दि.०१.०१.२०१८ रोजी दरम्यान केलेल्या आत्महत्या प्रकरणी पो.स्टे. मालेगांव येथे मर्ग क्र.०२/१८ कलम १७४ सी.आर.पी.सी. अन्वये नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी साक्षीदारांचे जबाबात मृतकाचे नावावर २.५ एकर जमीन होती, तसेच तो डोक्याने थोडा हलका होता. त्यांचेवर कोणत्याही बँकेचे कर्ज नव्हते. याबाबत पुढील चौकशी सुरु आहे. तसेच डिगांबर धंदरे यांनी दि.३१.१२.२०१७ रोजी दरम्यान केलेल्या आत्महत्या प्रकरणी पो.स्टे. मालेगांव येथे मर्ग क्र.०३/१८ कलम १७४ सी.आर.पी.सी. अन्वये नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी साक्षीदारांशी केलेल्या चौकशीअंती मृतक यास पोटदुखी व हातपायदुखी तसेच इतर शारिरिक व्याधीचा त्रास असल्याच्या कारणावरुन काहीतरी विषारी औषध प्राशन केल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने नाविन्यपूर्ण स्टार्टअप योजनेच्या माध्यमातून रोजगार निर्माण करण्याबाबत**

**(३७) १११५९७ (२८-०३-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नाविन्यपूर्ण स्टार्टअप योजनेच्या माध्यमातून २०१७ ते २०२२ या ५ वर्षात पाच लाख रोजगार निर्मिती करण्याचा निर्णय दिनांक २८ जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला असून या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी शासनाने महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी संस्था स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या रोजगार निर्मितीसाठी नाविन्यपूर्ण स्टार्ट अप धोरणास मान्यता दिली आहे परंतु या पूर्वीच्या काळात २०१६ यामध्ये अनेक स्टार्टअप कंपन्यांची कोट्यवधी रुपयांचे करार केले होते ते करार रद्द करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वीच्या करारांची उपलब्धी काहीही नसताना नवीन धोरण राबविण्याचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सन २०१५ ते २०१७ या काळात ज्या स्टार्ट अप कंपन्यांशी करार करण्यात आले त्यांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीचे अपेक्षित उद्दिष्ट पूर्ण न झाल्याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार या पूर्वीचे धोरण यशस्वी न होण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३१-०७-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.

नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरणास मान्यता देण्यापूर्वी २०१६ मध्ये कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून कोणत्याही स्टार्टअप कंपन्यांसोबत करार करण्यात आलेले नसल्याने ते रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही,
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) शहरात चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(३८) १११७१७ (१२-०४-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील धरणग्रस्तांच्या नविन कावसान या वसाहतीत सत्यवान हनुमंत पोटे यांच्या घराच्या मागील दरवाजाचे कुलुप तोडून चोरट्यांनी रुपये ६० हजार ची रोकड पळवून नेल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पैठण शहरात एकाच आठवड्यातील ही तिसरी घटना आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
व तदनुसार चोरट्यांना पकडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) जानेवारी २०१८ मध्ये पैठण पोलीस स्टेशन येथे घरफोडी २ गुन्हे, मोटारसायकल चोरी प्रकरणी १ गुन्हा व बॅटरी चोरीचा १ असे एकूण ४ गुन्हे दाखल आहेत.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, पैठण येथे गु.र.नं. १५/२०१८ भा.दं.वि. ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(३) पैठण शहरात एकाच आठवड्यात घरफोडीच्या २ घटना घडलेल्या असुन याबाबत पोलीस स्टेशन, पैठण येथे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) पैठण शहरातील चोरी प्रकरणी जानेवारी २०१८ मध्ये एकूण ४ गुन्हे दाखल असुन त्याचा तपास सुरु आहे. सदर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या घरझडत्या घेण्यात आल्या आहेत. औरंगाबाद जिल्ह्यात व पैठण पोलीस स्टेशनच्या हद्दीस लागुन असलेली पोलीस ठाणे शेवगाव, गेवराई व अंबड येथे तपास याद्या पाठविण्यात आलेल्या आहेत. तसेच आरोपींचा शोध घेण्याकरीता पोलीस ठाणेचे तपास पथक नेमण्यात आलेले आहे.

(५) विलंब झालेला नसुन तपास सुरु आहे.

---

## आडूळ (जि.औरंगाबाद) येथील जैन मंदिरात झालेली चोरी

**(३९) १११७२४ (१२-०४-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडूळ (जि.औरंगाबाद) येथील महावीर चौकाजवळील जैन मंदिरात दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील दान पेटीतील रोख रक्कम सुमारे २० हजार रूपये व ६५ हजार रुपये किंमतीचे तीन चांदीचे मुकुट असा एकूण रुपये ८५ हजारांचा ऐवज पळविल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पाचोड पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) व (२) दि.०९/०१/२०१८ रोजी रात्री अज्ञात आरोपींनी जैन मंदिरातील दानपेटीतील रुपये २०,०००/- रोख रक्कम व देवाचे चांदीचे ३ मुकुट असा एकूण ८५,०००/- रुपयांचा ऐवज चोरुन नेला असल्याबाबत प्राप्त फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, पाचोड येथे गु.र.नं. १०/२०१८ भा.दं.वि. ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या घरझडत्या घेण्यात आल्या आहेत. औरंगाबाद जिल्ह्यात व पैठण पोलीस स्टेशनच्या हद्दीस लागुन असलेली पोलीस ठाणे पैठण, करमाड, अंबड व गोंदी येथे तपास याद्या पाठविण्यात आलेल्या आहेत. तसेच आरोपींचा शोध घेण्याकरीता पोलीस ठाणेचे तपास पथक नेमण्यात आलेले असुन गुन्ह्याचा तपास चालू.

(४) विलंब झालेला नसुन तपास सुरु आहे.

---

## नाशिक शहरात गुन्हेगारीमध्ये होत असलेली वाढ

**(४०) ११२११६ (१२-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील कायदा व सुव्यवस्था ढासळली असल्याने येथील गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार सदर जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) नाशिक पोलिस आयुक्तालयात माहे जाने.२०१७ मध्ये दाखल २७६ गुन्ह्यांपैकी १५५ गुन्हे (५६%) उघडकीस आले असून माहे जाने.२०१८ मध्ये दाखल २९७ गुन्ह्यांपैकी १८३ गुन्हे (६२%) उघडकीस आले आहेत.

| अ.क्र. | हेड | जानेवारी २०१७ | | | जानेवारी २०१८ | | | वाढ /घट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | टक्के | दाखल | उघड | टक्के | |
| १ | खुन | १ | १ | १००% | ३ | ३ | १००% | २ |
| २ | खुन प्रयत्न | ६ | ६ | १००% | ३ | ३ | १००% | -३ |
| ३ | बलात्कार | ३ | ३ | १००% | ० | ० | -- | -३ |
| ४ | दरोडा | १ | १ | १००% | २ | २ | १००% | १ |
| ५ | जबरी चोरी | १४ | ६ | ४२% | १५ | १५ | १००% | १ |
| ६ | घरफोडी | २६ | ९ | ३४% | ३८ | १८ | ४७% | १२ |
| ७ | चोरी | ३४ | १७ | ५०% | १९ | १४ | ७३% | -१५ |

(२) नाशिक पोलिस आयुक्तालयातील पोलीस स्टेशन हद्दीतील चैन स्नॅचिंग/घरफोडी/वाहन चोरीच्या घटनांना प्रतिबंध घालणेकामी नाकाबंदी, झोपडपट्टी चेकिंग, पायी पेट्रोलिंग, मोहल्ला कमिटी/शांतता समिती बैठक सतत आयोजित करून जनजागृती करण्याबाबत सुचना देण्यात येतात. गुप्त बातमीदारांमार्फत रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर पाळत ठेवून प्रतिबंध कारवाई करण्यात येते. वाहन चोरीसंदर्भात नंबर प्लेट, चेसीज, इंजिन नंबर, नंबर प्लेट तपासणी करणेबाबत सुचना देण्यात येतात.

घरफोडी / चैन स्नॅचिंग संदर्भात सरप्राइज चेकिंग रेकॉर्डवरील गुन्हेगार यांच्या घरझडत्या घेवून त्यांचे हालचालीवर लक्ष ठेवण्यात येते. गुन्हयातील अटक आरोपींविरूध्द भादवि कलम ३९२, ३९४ नुसार तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ११० व मपो अ. कलम ५६ प्रमाणे तडीपारीच्या कार्यवाही करण्यात आलेल्या आहेत.
(३) विलंब झालेला नाही.

---

### ठाणे जिल्हा पोलीसांनी पेट्रोल पंपावर धाड टाकून भेसळयुक्त पेट्रोल जप्त केल्याबाबत

**(४१) ११२३४२ (१२-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा पोलिसांनी संतोष हॉटेल समोरील पेट्रोल पंपावर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान धाड टाकून भेसळयुक्त पेट्रोल जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पेट्रोलपंप मालकांवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी ठाणे शहर आयुक्तालय व ठाणे ग्रामीण जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान याबाबत कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन राज्याच्या सिमेवरील प्रेमनगर या गावातील महिलेचा झालेला मत्यु

**(४२) ११२७१८ (१२-०४-२०१८). अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बंजारा आणि गोंड या समाजातील आरक्षणावरून झालेल्या वादामुळे महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन राज्यातील सिमेवरील प्रेमनगर या गावातील नागरीकांना शेतात आश्रय घ्यावा लागला व त्यात श्रीमती गुणाबाई उत्तम जाधव या महिलेचा मत्यु झाल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने राज्याच्या सिमेवरील नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१), (२) व (३) तेलंगणा राज्यात अनुसूचित जमाती विरुध्द बंजारा समाजाची सवलतीचे कारणावरुन वाद निर्माण होऊन दंगल झाली होती. सदर घटनेचे पडसाद सीमेवरील इतर भागात दिसून आले. त्यावेळी आदिवासी समाजाचे लोकांनी बंजारा समाजातील लोकांना गांव सोडून जाण्याबाबत धमकावत त्यांच्या गाईचा गोठा जाळण्याचा प्रयत्न केल्याने पोलीस स्टेशन जिवती येथे ९० ते १०० लोकांविरुध्द बेकायदेशीर जमाव करण्याबाबत अप क्र. १४८/२०१७ कलम १४३, १४५, १४९, ५०४, ५०६ भादंवि सहकलम १३५ मुपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर चौकशी अंती मृतक यांनी त्यांचे शेतात कच्चे झोपडे टाकून शेतात असलेल्या उभ्या पिकांचे संरक्षण होणे करिता तसेच वन्य प्राण्यांकडून पिकाची नासाडी होऊन नये म्हणून रहात होते. सदर मृतकास पहाटे थंडी लागत असल्याने त्यांना उपचाराकरिता जिवती येथील रुग्णालयात नेत असताना तीचा मृत्यू झाला. आरक्षणाच्या वादाचा व महिलेच्या मृत्यूचा एकमेकांसोबत कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.

सदरचे परिसरात पोलीस मदत केंद्र वणी कॅम्प, पो.स्टे., जिवती द्वारे योग्य पेट्रोलिंग ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माथाडी कृती आराखड्याची अंमलबजावणी करणेबाबत

**(४३) ११३१९८ (१२-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथाडी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सन २०१५ मध्ये राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन बनविण्यात आलेल्या कृती आराखड्याची अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथाडी कायद्याअंतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कृती आराखड्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कृती समीती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या माथाडी कृती आराखड्याची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (११-०७-२०१८) :** (१) कृती आराखाडयाची दि.०६/०९/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंमलबजावणी करण्यांत येत आहे.

(२) महाराष्ट्र माथाडी, हमाल व श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम १(४) अंतर्गत राज्यात टप्प्याटप्याने ३६ माथाडी मंडळ स्थापन करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) १) राज्यातील सर्व जिल्ह्यात माथाडी कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कृती समिती गठीत केलेली आहे.

२) सर्व माथाडी मंडळासाठी एकत्रित एक संकेतस्थळ तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

३) मंडळातील नोंदीत मालकांना मजुरी व लेव्हीची रक्कम धनादेशाव्दारे /आरटीजीएस व्दारे देण्याच्या सुचना मंडळाने निर्गमित केलेल्या आहेत.

४) माथाडी स्वरुपाच्या कामाची मंडळाच्या निरिक्षकाव्दारे प्रत्यक्ष पाहणी करुन प्रत्यक्ष काम करीत असलेल्या कामगारांची नावे निरीक्षण शेऱ्यात नमुद करुन त्या कामगारांना व सदर मालकास मंडळात नोंदीत करण्याची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येत आहे.

५) फक्त वाराईकरीता कामगार नोंदीत न करण्याच्या सुचना सर्व माथाडी मंडळांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वाराईची रक्कम रोखीने स्विकारता नोंदीत मालाकांना सदरची रक्कम आरटीजीएस व्दारे अदा करण्याच्या सुचना मालकांना देण्यात आलेल्या आहेत.

६) मंडळातील सर्व नोंदीत कामगारांना ओळखपत्र देण्यात येत आहे.

७) माथाडी कामगारांच्या मजुरीची रक्कम परस्पर कामगारांनी निश्चीत न करता मंडळ योजनेच्या तरतुदीनुसार मंडळामार्फत निश्चित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यात अवैध धंदे मोठ्या प्रमाणावर सुरु असल्याबाबत**

**(४४) ११३९१४ (१२-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात पोलीस प्रशासनाच्या हेतुपुरस्सर दुर्लक्षामुळे अनेक ठिकाणी खुनाचे प्रकार, चोऱ्यांचे प्रमाण वाढणे, घरफोड्या, अवैध वाहतुक, जुगार, सट्टा इत्यादी अवैध धंदे मोठ्या प्रमाणावर सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारोळा (जि.जळगांव) शहरासह तालुक्यात जुगार सुरु असल्याने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जुगार अड्डयावर छापा टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अवैध धंद्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न जिल्ह्यात वारंवार निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावे अशी मागणी एरंडोल-पारोळा मतदार संघातील लोकप्रतिनिधीनी वारंवार संबंधितांना केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) जळगाव जिल्हा घटकात खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| कालावधी | खून | घरफोडी | चोरी | जुगार | अवैध वाहतुक |
|---|---|---|---|---|---|
| २०१६ | ५३ | २७१ | ८८९ | ७९० | ५०६० |
| २०१७ | ५३ | २७८ | ९८४ | ८०२ | ४८४४ |
| मार्च १७ अखेर | १३ | ६३ | २२८ | १९७ | ६६५ |
| मार्च १८ अखेर | १४ | ८८ | २२२ | १८० | ६५० |

सदर गुन्हे उघडकीस आणून नियंत्रणात रहावे यासाठी वेळोवेळी पोलिस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून उचित कारवाई करण्याबाबत निर्देशित केले आहे. तसेच वाळु चोरी करणाऱ्यांविरूध्द कारवाई करून सन २०१७ मध्ये १०० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) दि.२५.१०.२०१७ रोजी पारोळा शहरात अवैध जुगार अड्डयावर छापा मारून अवैध जुगारात सक्रिय असलेल्या ५ गुन्हेगारांना ताब्यात घेवून रू.३२,३००/- रोख रक्कम, ३ मोटार सायकली

व पत्ते असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पारोळा पो.स्टे. येथे भाग -६, गुरनं-३०८७/२०१७ मु.जु.का.क.१२(अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पाचही आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) पारोळा पो.स्टे.मार्फत माहे ऑक्टो. ते डिसें.२०१७ या कालावधीत जुगार सदरात ६ छापे कारवाई करून रू.४१८१०/- रोख रक्कम, ३ मो.सायकली, जुगार साधने असा मुद्देमाल तर दारूबंदी सदरात ३२ केसेस करून रू.४३,४१४/- किंमतीचा मुद्देमाल व गावठी दारू, अवैध दारू जप्त करण्यात आली आहे. बेशिस्त वाहनचालकांविरूध्द ३७८ केसेस करून रू.१,१३,४००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

एरंडोल पो.स्टे.मार्फत जुगार सदरात एकूण ४ केसेस करून रू.११,७०५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(६) विलंब झालेला नाही.

---

## सांगली शहरातील भूमी प्रॉपकॉर्न संस्थेने एका महिलेची १० लाख रुपयांची ठेव परत न दिल्याबाबत

**(४५) ११४७७९ (१४-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील भूमी प्रॉपकॉर्न संस्थेने एका महिलेची रुपये १० लाखांची ठेव परत न दिल्यामुळे विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला तरी अद्याप त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून लोकांची फसवणूक करणाऱ्या येथे अनेक बेकायदेशीर कंपन्या कार्यरत असुन त्यांची जिल्हा प्रशासनाकडे कोणतीही नोंद नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील गुन्ह्याची नोंद घेऊन शासनाने या संस्थेच्या संचालकावर कारवाई करण्यासोबतच शोधमोहिम राबवून येथील बँकीग क्षेत्रातील अन्य बेकायदेशीर कंपन्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी आरोपीने भुमी प्रॉपकॉन प्रायव्हेट लि. नावाची कंपनी चालु करुन, फिर्यादिस त्या कंपनीत गुंतवणुक करण्यास भाग पाडुन, फिर्यादीकडुन १० लाख रुपये घेवुन, फसवणूक केले प्रकरणी विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३६२/२०१७ भा.दं.वि.कलम ४२०, ४०६, ३४ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या हित संबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ कलम ३, ४ प्रमाणे दि.१९/१२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी ३ आरोपी निष्पन्न झाले असून, एका आरोपीस अटक करण्यात आली असून दोन आरोपी अटकपूर्व जामीनावर आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

आकर्षक व्याजदर व परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणुकदारांची फसवणूक करणाऱ्या वित्तीय संस्थांसंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सर्व पोलीस घटकांना गृह विभाग शासन परिपत्रक क्र. एमपीआय-१११७/प्र.क्र.९७५/पोल-११, दि.२९/०९/२०१७ अन्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**कोळपे पाटील पतसंस्थेने (ता.बिलोली, जि.नांदेड) ठेवीदारांची फसवणूक केल्याबाबत**

**(४६) ११४८०१ (१४-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळपे पाटील पतसंस्थेने (ता.बिलोली, जि.नांदेड) ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून देखील या गुन्ह्यातील आरोपींना अद्यापही अटक करण्यात आली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाच्या तपासात विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणातील दोषी आरोपींवर कारवाई तसेच ठेवीदारांच्या रक्कमा परत करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१), (२) व (३) कोळपे पाटील पतसंस्थेने ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल नाही. परंतु सदर पतसंस्थेने फसवणूक केल्याप्रकरणी हदगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२७०/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, २०१, १०९, ३४ सह एम.पी.आय.डी. कायदा १९९९ चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात आजपावेतो एकुण २० साक्षीदार/गुंतवणूकदार यांची एकुण १९,७२,९३७/- इतक्या रकमेची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले असुन गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**कौशल्य विकास केंद्रातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे व पदोन्नतीबाबत**

**(४७) ११५६०५ (१७-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नतीसाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखला असून त्याबाबत शासन निर्णय निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यात असलेल्या कौशल्य विकास केंद्रामध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नती अनेक महिने प्रलंबीत असल्यामुळे पदोन्नतीपासुन वंचित राहून बरेचसे कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून पुणे जिल्ह्यातही पदोन्नती न मिळाल्यामुळे अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयाच्या अनुषंगाने कौशल्य विकास केंद्रामधील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नतीसाठी कोणती निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-०७-२०१८) :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

(३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९.१२.२०१७ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार खुल्या प्रवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोगस माथाडी कामगारांची नोंदणी करून गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४८) ११५६४७ (१४-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माथाडी कामगारांची नोंदणी माथाडी मंडळाकडे करणे बंधनकारक असून मंडळाचे अधिकारी स्वतः जाऊन नोंदणी केलेल्या कामगारांची प्रत्यक्षात पाहणी केल्यानंतर त्यांना दरमहा पगार मंडळाकडून देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे माथाडी, हमाल व श्रमजीवी कामगार मंडळाच्या अधिकाऱ्यांना दबाव टाकून बोगस कामगारांची नोंदणी करून त्यांचा पगार परस्पर घेत असल्याचा प्रकार माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत कामगार नेते बाबा आढाव यांनी माथाडी मंडळ, पुणे यांना पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोगस माथाडी कामगारांच्या नोंदीबाबत चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

माथाडी कामगारांची मंडळात नोंदणी करणेपूर्वी मंडळाचे निरिक्षक/ अधिकारी स्वत: जाऊन काम करित असलेल्या माथाडी कामगारांची प्रत्यक्ष पाहणी करतात व त्यानंतर माथाडी स्वरुपाचे प्रत्यक्ष काम करणाऱ्या कामगारांना मंडळात आवश्यक त्या कागदपत्रांची (वयाचा पुरावा, राहण्याचा ठिकाणाचा पुरावा, आधार कार्ड, निवडणूक ओळख पत्र, पॅन कार्ड, संबंधित पोलीस स्टेशनचा वर्तणूक दाखला) पूर्तता केल्यानंतर नोंदीत करण्यात येते. तद्नंतर नोंदीत मालकाने दरमाह मजूरी व लेव्हीचा भरणा मंडळात धनादेशाद्वारे / आर.टी.जी.एस. द्वारे केल्यानंतर मालकाने सादर केलेल्या हजेरीपत्रेकानुसार माथा/ वाटणी काढून माथाडी कामगारांना बँकेद्वारे पगार अदा केला जातो.

(२) हे खरे नाही. तथापि, अशा स्वरुपाचे वृत्त दि.१६/०२/२०१८ व दि.१७/०२/२०१८ रोजीच्या सकाळ वृत्त पत्रामध्ये आले होते.

(३) डॉ.बाबा आढाव यांनी दि.१५/०२/२०१८ रोजी निवेदन दिले आहे. सदर निवेदनात बोगस संघटनांची नोंदणी रद्द करावी, असे नमूद केले आहे.

(४) चौकशीअंती बोगस माथाडी कामगारांची नोंदणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले सबब, कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीची सुमारे १ लाख ७७ हजार २५९ पदे रिक्त असल्याबाबत**

**(४९) ११५६९५ (१८-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीची सुमारे १ लाख ७७ हजार २५९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर पदांऐवजी शासनाने काही तुटपुज्या पदांच्या भरतीची जाहिरात दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच त्याच्या निषेधार्थ स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने राज्यातील विविध शहरांमध्ये मोर्चे काढण्याचा इशारा शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास शासनाने सदर संपुर्ण पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) सर्व प्रशासकीय विभांगाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दि.३१/१२/२०१६ अखेर १,३०,५७९ इतकी शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे.

(२) दिर्घकालीन वित्तीय स्थैर्यासाठी वेतनवाढीचा सरासरी दर हा महसूल वाढीच्या सरासरी दरापेक्षा अधिक असता कामा नये, हे सर्वसाधारण तत्व पाळण्यासाठी तसेच, केंद्र शासनाच्या धर्तीवर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन सुधारणा करण्याचा निर्णय झाल्यास, वेतनावरील खर्चात संभाव्य वाढ विचारात घेऊन नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती यावर नियंत्रण आणण्यासाठी वित्त विभागाने दि.०२/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवेने पदभरतीवर काही प्रमाणात निर्बंध घातले आहेत. ज्या संवर्गात सदर शासन निर्णयात नमूद विहित टक्केवारीपेक्षा जास्त प्रमाणात पदे भरण्याची तातडीची गरज आहे असे प्रस्ताव तपासून शिफारस करण्यासाठी मा.अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच, वित्त विभागाने दि.०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयात सुधारणा करुन,महसूली उत्पन्न वाढवून देणाऱ्या काही विभागांना तसेच, अत्यावश्यक सेवा म्हणून शासकीय रुग्णालयातील डॉक्टर्स तसेच, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापक वर्ग व रुग्ण सेवेशी संबंधित कर्मचारी यांना पदभरतीच्या निर्बंधातून वगळले आहे. त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभागाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोगास प्राप्त होणाऱ्या मागणीपत्रांच्या आधारे आयोगामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात येते.
(३) होय, राज्यसेवा परीक्षेसाठीच्या जागा वाढविण्यात याव्यात या प्रमुख मागणीसाठी स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांनी पुणे, औरंगाबाद, नगर, नाशिक, नागपूर या जिल्ह्यांसह मुंबई येथे दिनांक ८ फेब्रुवारी, २०१८ रोजी आंदोलन केले होते.
(४) व (५) विधिमंडळात आश्वासित केल्यानुसार विविध विभागातील सरळसेवेची एकूण ३६,००० पदे भरण्यास मान्यता देण्यात आली असून, त्यानुसार आवश्यक कार्यवाही वित्त विभागाकडून करण्यात येत आहे.

---

**सोलापूर ग्रामीण पोलीसांनी बनावट नोटांच्या छपाई प्रकरणी जळगांव पोलीस मुख्यालयातील एका हवालदारास अटक केल्याबाबत**

**(५०) ११६१६२ (१२-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर ग्रामीण पोलीसांनी १०० आणि ५० रूपयांच्या बनावट नोटांच्या छपाई प्रकरणी जळगांव पोलीस मुख्यालयातील एका हवालदारास दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) व (२) ५० रूपयांच्या बनावट नोटांच्या छपाई प्रकरणी जळगांव पोलीस मुख्यालयातील एका शिपाईसह अन्य एका आरोपीस दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी भिमानगर ता.माढा व मौजे टाकळी (टें) ता.माढा येथून अटक करण्यात आले. हे दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

याप्रकरणी एकूण ६ आरोपींविरूध्द टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३२/२०१८ भादंवि.क.४८९अ, ४८९क, ४८९ड, ३५३, ३३२, १२०ब, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितित गुन्हा तपासावर आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.